मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

| अ. क्र. | विभागाकडून/कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधी सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता/ बोरीवली विभाग/ मुंबई मंडळ - मुंबई मंडळाच्या मुंबई उपनगरात जुन्या संक्रमण शिबीराच्या पुर्नविकास योजना व मोकळया जमिनीवरील गृहनिर्माण योजनेअंतर्गत संक्रमण गाळे, आर्थिकदृष्या दुर्बलगट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट, उच्च उत्पन्न गट यासाठी गृहनिर्माण योजना राबविणे तसेच तांत्रिक व इतर पत्रव्यवहार करणे, माहितीचा अधिकार अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांना माहिती पुरविणे, ३३(५) पुर्नविकासाशी संबंधित कामे, उपनगरातील जुन्या वसाहतींच्या बाहय सुविधा देखभाल दुरूस्ती करणे. | आवश्यकतेनुसार १ ते ७ दिवसांच्या कालावधीत सेवा पुरविली जाते व इतर बाबतीत कामाच्या स्वरुपानुसार निर्णय घेण्यात येतात. | कार्यकारी अभियंता / बोरीवली विभाग<br><br>उपअभियंता-१,<br>उपअभियंता-२,<br>उपअभियंता-३,<br>उपअभियंता-४,<br>सहायक अभियंता,<br>कनिष्ठ अभियंता (उपविभाग-१),<br>कनिष्ठ अभियंता (उपविभाग-२),<br>कनिष्ठ अभियंता (उपविभाग-३),<br>कनिष्ठ अभियंता (उपविभाग-४),<br>सहायक,<br>वरिष्ठ लिपिक,<br>कनिष्ठ लिपिक टंकलेखक,<br>स्थापत्यअभियांत्रिकी सहायक,<br>भूमापक | कार्यकारी अभियंता/ बोरीवली विभाग/ मुंबई मंडळ<br>दूरध्वनी क्रमांक - ६६४०५३३५ |

कार्यकारी अभियंता
बोरीवली विभाग / मुंबई मंडळ

## विवरणपत्र -अ

१. मंत्रालयीन विभागाचे नांव :
२. विभागाचे मूळ नागरिकांची सनद प्रसिध्द केल्याचा दिनांक :
३. नागरिकांची सदन अद्ययावत केल्याचा दिनांक :
४. अद्ययावत नागरिकांची सनद वेबसाईटवर प्रसिध्द केल्याचा दिनांक :
५. विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय शासकीय कार्यालयांची एकूण संख्या :

| अ.क्र. | नागरिकांची सनद प्रसिध्द केलेल्या कार्यालयांची संख्या | नागरिकांची सनद प्रसिध्द न केलेल्या कार्यालयांची संख्या व नांवे | नागरिकांची सनद प्रसिध्द न केलेल्याची कारणमीमांसा [कार्यालय निहाय] त्यासाठी जवाबदार अधिका-यांविरुध्द केलेल्या कार्यावाहीचा तपशील | नागरिकांचीसनद विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या कार्यालयांची संख्या | नागरिकांचीसनद विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द न केलेल्या कार्यालयांची संख्या | नागरिकांची सनद कार्यालयाच्या दर्शनी भागावर न लावलेल्या कार्यालयांची संख्या व नांवे | नागरिकांची सनद अद्यावत केलेल्या कार्यालयांची संख्या | नागरिकांची सनद अद्यावत न केलेल्या कार्यालयांची संख्या व नावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

या कार्यालयाच्या अंतर्गत स्वतंत्र क्षेत्रीय कार्यालय नाही त्यामुळे माहिती निरंक आहे.

कार्यकारी अभियंता,
बोरीवली विभाग / मुंबई मंडळ

**<u>अतितात्काळ/महत्वाचे</u>**

जा.क्र./प्राधि/नागरिकांची सनद/२०२६/ 8701831 /प्र.१५
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व ), मुंबई -४०००५१
दिनांक :- 25.03.2026

प्रति,

१) मा. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मा. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ/मुं. इ. दु. व पु. मंडळ,
३) मुख्य अभियंता-१/२/३/प्रा.
४) विधी सल्लागार/प्रा.
५) वित्त नियंत्रक /प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा.
७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/प्रा.
८) मुख्य अधिकारी, मुं. झो. सु. मंडळ/कोकण मंडळ/पुणे मंडळ नाशिक मंडळ/नागपूर मंडळ/छ.संभाजी नगर मंडळ/अमरावती मंडळ,
९) चौकशी अधिकारी /प्रा.
१०) सक्षम प्राधिकारी-१/२/प्रा.
११) मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा.
१२) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.

विषय:- नागरिकांची सनद तयार करुन प्रसिद्ध करण्याबाबत.

संदर्भ :- उप सचिव/सामान्य प्रशासने विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. रागांअ-१५२५/प्र.क्र.५६/रवका-२, दि.२४.०३.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधिन शासन पत्राची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने आपल्या विभागाने/मंडळांने अद्ययावत केलेली नागरिकांची सनद <u>आजच</u> संकेतस्थळावर प्रसिध्द करुन कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावून त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी, हि विनंती.

**आपला विश्वासू,**

सोबत :- वरीलप्रमाणे

25/3/2026

**(मयूर घोडविंदे)**
**प्रशासकीय अधिकारी-२/प्राधिकरण**

प्रत:- प्र.५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१६,१७,१८/प्रा. यांनी सचिव/प्रा. कार्यालयाशी संबंधित नागरिकांची सनद अद्ययावत करणेबाबत आपल्या प्रशासनाशी संबंधित मुद्यांबाबत अद्ययावत माहिती <u>आजच</u> सादर करावी.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

७१३, मंत्रालय (विस्तार इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन ४०००३२.

---

क्र. रागांअ-१५२५/प्र.क्र.५६/रवका-२, दिनांक: २४ मार्च, २०२६.

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग

<u>विषय</u> :- नागरीकांची सनद अद्ययावत करुन प्रसिद्ध करण्याबाबत.

<u>संदर्भ</u> :- प्रधान सचिव (प्र.ना.उ. व सु.) सामान्य प्रशासन विभाग, यांचे अ.शा.पत्र क्र. नासंद-१५२५/प्र.क्र.५६/रवका-२, दिनांक ०९ जानेवारी, २०२६.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भाधिन अर्धशासकीय पत्राचे अवलोकन व्हावे. (प्रत संलग्न)

२. यानुसार सर्व विभागांनी त्यांच्या अधीनस्त असलेल्या योजनांचा नागरिकांच्या सनदेमध्ये समावेश करुन वेबसाईटवर प्रसिद्ध केल्या असाव्यात अशी धारणा आहे.

कृपया सदर धारणा पक्की करावी व वेबसाईटची लिंक या विभागास सादर करावी, ही विनंती.

(हेमंत महाजन)
शासनाचे उप सचिव
desk18a.gad@maharashtra.gov.in

प्रत:- मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.

अ.शा. पत्र क्र.नासद-१५२५/प्र.क्र.५६/र.व का.२
सामान्य प्रशासन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दि. ०९ जानेवारी, २०२६.

डॉ. अतुल पाटणे
प्रधान सचिव(प्र.ना.उ.व सु.)

प्रिय श्री/श्रीमती,

कृपया, उक्त विषयावरील या विभागाचे दिनांक ०९.१२.२०२५ रोजीच्या अ.शा. पत्राचे अवलोकन व्हावे. (प्रत संलग्न)

०२. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ३ मध्ये नमूद केल्यानुसार, प्रत्येक कार्यालयाने/विभागाने त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सुविधा किंवा सेवा पुरविण्यासाठी सादर केलेल्या परिपूर्ण अर्जावर कार्यवाही करण्याकरिता लागणारा कालावधी नागरिकांच्या सनदेत नमूद करणे अपेक्षित आहे. प्रत्येक कार्यालयाने/विभागाने नागरिकांची सनद प्रसिद्ध करणेबाबतच्या सूचना या विभागाकडून वेळोवेळी परिपत्रकान्वये, अर्धशासकीय पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

०३. तथापि, विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची परिपूर्ण माहिती नागरिकांना उपलब्ध होण्यासाठी सर्व विभागांनी नागरिकांची सनद अद्ययावत करणे आवश्यक आहे. मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत, सर्व विभागांनी त्यांच्या अधीनस्थ असलेल्या योजनांचा नागरिकांच्या सनदेमध्ये समावेश करून प्रसिद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१. विभागाच्या सर्व १०० टक्के सेवांचा नागरीकांच्या सनदेमध्ये समावेश करण्यात यावा. या सेवांच्या मंजुरी प्रक्रियेचे पुनर्विलोकन करुन कालमर्यादा निश्चित करण्यात यावी.

२. सर्व कालमर्यादा निश्चित करताना, विभागांनी प्रक्रियेच्या प्रत्येक स्तरावर लागणारा वेळ विचारात घेऊन व्यवहार्य कालमर्यादा (कार्य दिन) नमूद करणे आवश्यक आहे. नागरीकांच्या सनदेचा संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाचा नमूना तसेच कार्यालयीन

दर्शनी भागात प्रसिद्ध करावयाचा नमूना सोबत जोडलेल्या १ ते २ प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे तयार करण्यात यावा.

३. विभागाच्या अंतिम मंजुरीनंतर, संबंधित सेवांच्या कालमर्यादेची सूचना कार्यालयाच्या दर्शनी भागात तसेच विभागाच्या/कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

४. नागरिकांना सेवेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची व्यवस्था असावी. आपणास विनंती करण्यात येते की, आपण व्यक्तीश: लक्ष घालून आपल्या विभागाची तसेच अधीनस्थ कार्यालयांची अद्ययावत सनद (सेवा व सुविधांसह) शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच विभागाच्या/कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावी, व त्याची एक प्रत या विभागास तसेच मुख्यमंत्री कार्यालयास (हार्ड/सॉफ्ट कॉपीसह) उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधितांना कृपया आपल्या स्तरावर उचित निदेश द्यावेत.

आपला स्नेहांकित,

(डॉ. अतुल पाटणे)

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.